पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-**8007269000**
ईमेल नं.-**jansampark.osd@gmail.com**

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' 'मंगळवार-दि.**11.03.2025**

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.**10** मार्च रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण **291** कारवाया करुन **2,41,400 ₹** 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

नळदुर्ग पोलीस ठाणे:आरोपी नामे-राम हनुमंत सुतार, वय 35 वर्षे रा.बोळेगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.10.03.2025 रोजी 17.50 वा. सु. गावातील आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे 2,600 ₹ किंमतीची 30 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-मधुकर तुळशीराम लोंढे , वय 40 वर्षे रा.इंदीरानगर चिवरी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.10.03.2025 रोजी 18.45 वा. सु. गावातील आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे 1,800 ₹ किंमतीची 20 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- 65(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदविले आहेत.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे:आरोपी नामे-राणी सुरेश काळे, वय 24 वर्षे, रा. पळसप पारधीपिडी ह.मु. उपळा शिवार जि. धाराशिव हे दि.10.03.2025 रोजी 16.10 वा. सु. विद्युत कंपनीचे शेडजवळ उपळा शिवार येथे अंदाजे 3,300 ₹ किंमतीची 66 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- 65(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

" प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल."

येरमाळा पोलीस ठाणे :आरोपी नामे-शाहरुख दस्तगीर शेख, वय 28 वर्षे, व्य- चालक रा. शेख वस्ती भिगवन ता. इंदापुर जि. पुणे, तौसिफ शेख यांनी दि.10.03.2025 रोजी 02.30 वा.सु.येरमाळा ते धाराशिव जाणारे रोडवर उपळाई पाटी येथे पिकअप क्र एमएच 42 एक्यु 0292 व पिकअप क्र एमएच 11 बीएल 4209 या दोन्ही वाहना 25 गोवंशीय जातीचे जर्सी गाय व वासरे एकुण 1,04,000₹ किंमतीचे वाहनासह एकुण 6,24,000 ₹ किंमतीच्या वाहना मध्ये जनावरांना आखुड दोरीने जास्त बांधून ठेवून त्यांना पुरेशी हालचाल करता येणार नाही व त्यांचे अन्न पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना येरमाळा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम 3,11(1) (डी) (एफ) (एच) (के) सह प्राणी संरक्षण अधिनियम कलम 5, 5(अ)(1)(2), 5(ब) सह 119 मपोअ सह 83/177, 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद."

लोहारा पोलीस ठाणे:आरोपी नामे-अशोक बब्रुवान काटे, वय 38 वर्षे, रा. लोहारा बु. ता. लोहारा जि. धाराशिव,मंहमद बाबुमिया शेख, वय 65 वर्षे, रा. लोहारा बु. ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.10.03.2025 रोजी 16.00 वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲपे रिक्षा क्र एमएच 25 एम 896 व टाटा मॅजिक क्र एमएच 12 एडब्ल्यु 8095 ही वाहने लोहारा ते मार्डी जाणारे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना लोहारा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम 285अन्वये लोहारा पो.ठा. येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदवले आहेत.

मुरुम पोलीस ठाणे:आरोपी नामे-महादेव शरणप्पा कुंभार, वय 35 वर्षे, रा. बेळंब ता.उमरगा जि. धाराशिव, सुरेश माणिक डुकरे, वय 42 वर्षे, रा. अचलेर ता. उमरगा जि. धाराशिव, मशाक महेबुब पिंजारी, वय 25 वर्षे, रा. आलुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.10.03.2025 रोजी 11.45 ते 16.30 वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे छोटा हत्ती क्र एमएच 25 एके 7657, ॲपे रिक्षा क्र एमएच 44 सी 5504 व ॲपे रिक्षा क्र एमएच 44 एन 665 ही वाहने

आलुर बसस्थानक समोर, आष्टाकासार बसस्थानक समोर व विकास हायस्कुल रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम 285अन्वये मुरुम पो.ठा. येथे स्वतंत्र 3 गुन्हे नोंदवले आहेत.

**" पोलीस ठाणे परिसरात आरडा ओरड करणाऱ्या मद्यपीवर गुन्हा दाखल."**

परंडा पोलीस ठाणे :आरोपी नामे- सोनवणे,आकाश मोहन, वय 29 वर्षे, रा. भिमनगर धाराशिव ता. जि. धाराशिव ह.मु. फुरसुंगी पुणे हे दि.10.03.2025 रोजी 12.30 वा सुमारास परंडा पोलीस ठाणे परिसर येथे मद्यधुंद अवस्थेत आरडा ओरड करून गोंधळ घालताना परंडा पो. ठा. च्या पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द म.द.का. कलम 85, 110/117 म.पो.अ अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**" मालमत्तेविरुध्द गुन्हे."**

कळंब पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-राजाभाउ रावण शिंदे, वय 56 वर्षे, रा. लोहाटा प ता. कळंब जि. धाराशिव  हे व त्यांची पत्नी असे कळंब येथे बाजार करुन गावाकडे येत असताना खडकी शिवारात रोउवर तीन इसमांनी मोटरसायकल क्र एमएच 12 एचजी 7258 वरुन येवून राजाभाउ शिंदे यांची मोटरसायकल आडवून त्यांचे पत्नी चे गळ्यातील 12 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण 36,000₹ किंमतीचे जबरीने लुटून पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- राजाभाउ शिंदे यांनी दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 309(4),126(2), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उमरगा पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-अफरोज लियाकत ईनामदार, वय 31 वर्षे, रा.गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे 3,00,000₹ किंमतीची बुलेट क्र एमएच 25 एझेड 8700 ही दि. 07.03.2025 रोजी 00.50 वा. सु.डॉ. फरीद अब्दुल रफीक अत्तार यांचे घरासमोरुन हमीद नगर काळे प्लॉट उमरगा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अफरोज ईनामदार यांनी दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

कळंब पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-शंकर विष्णु जाधव, वय 40 वर्षे, रा.लोहाटा प. ता. कळंब जि. धाराशिव  यांची अंदाजे 20,000₹ किंमतीची स्प्लेंडर प्लस मोटरसायकल क्र एमएच 25 एक्स 1194 ही दि. 09.03.2025 रोजी 13.00 वा. सु.डॉ. डिकले घरासमोरुन तांदुळवाडी रोड कळंब येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- शंकर जाधव यांनी दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-संदेश रंगनाथ हांगरगेकर, वय 28 वर्षे, रा.हंगरगा. ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे ज्युपीटर टीव्हीएस कंपनीच्या स्कुटी क्र एमएच 25 एस 2606 ची डिग्गी उघडून डिग्गीमधील पिवळ्या कॅरीबॅगमध्ये ठेवलेली रोख रक्कम 3,50,000₹ ही दि.10.03.2025 रोजी 12.25 ते 12.28 वा. सु. आयडीबीआय बॅकेसमोर तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संदेश हांगरगेकर यांनी दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"फसवणूक."**

शिराढोण पोलीस ठाणे: आरोपी नामे-अ.नसीर महमुद अहमद रा. 269 तहसील स्वार वरद नं 4 मोहला अगलागा रोड रसुलपुर रामपूर यु पी 244924 ब. ड्रायव्हर प्रविणकुमार यांनी दि. 15.02.2025 रोजी 13.30 वा.सु. नॅचरल शुगर कारखाना, रांजणी ता. कळंब येथे फिर्यादी नामे- श्यामसुंदर उत्तमराव मोरे, वय 32 वर्षे, रा. आलेगाव ता. कंदार जि. नांदेड  यांना नमुद आरोपींनी संपर्क साधून नॅचरल शुगर कारखाना, रांजणी येथुन 30 टन साखरेचे पोते अंदाजे 11,56,125₹ किंमतीचे  वाहनात भरुन  राजा ट्रेडींग कंपनी प्रयागराज उत्तर प्रदेश  येथे  पोच करणेकामी डिझेल ॲडवान्स स्कॅनर द्वारे घेवून गेला असता सदर माल पोच न करता विश्वासघात करुन फसवणुक केली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-श्यामसुंदर मोरे यांनी दि.10.03.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 316(2),(3), 318(3) (4), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

आंबी पोलीस ठाणे: आरोपी नामे-पिंटु खरात, रा. साकत, कुमार गव्हाणे, जिवण गव्हाणे, दोघे रा. पिंपळगाव रामा थोरात, रा. अंतरगाव, येडबा कसबे, चिंचपुर ता. भुम जि. धाराशिव यांनी दि. 07.03.2025 रोजी 06.00ते दि. 09.03.2025 रोजी 10.00 वा.सु. कानडी शेत गट नं 175 मध्ये फिर्यादी नामे-सुनिल लक्ष्मण ढवारे, वय 53 वर्षे, रा.पाथ्रुड ता. भुम जि. धाराशिव यांनी नमुद आरोपींना ऊस तोडून देण्यासाठी पैसे दिले असतान नमुद आरोपींतानी सुनिल ढवारे यांचा ऊस तोडून न देता ऊस पेटवून देवून ऊसाचे नुकसान करुन फसवणुक केली. फिर्यादी हे विचारण्यास गेले असता जातीवाचक शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. ऊस्   चोरुन घेवून गेले.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुनिल ढवारे यांनी दि.10.03.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 318(4),326(एफ), 303(2), 352, 351(2),351(3),189(2), 190 सह कलम 3(2)(व्हिए),3(1)(आर),3(1)(एस) अ.जा.ज. अ.प्र.का.अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"जाळुन नुकसान करणाऱ्यावर गुन्हा दाखल."**

<u>तामलवाडी पोलीस ठाणे:</u> आरोपी नामे-सोनु बालाजी घोडके, गौरी हनमंत बटाणे, दोघे रा. सावरगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि. 10.03.2025 रोजी 20.45 वा.सु. इंदीरानगर झोपडपट्टी येथे असलेल्या पत्र्याचे गोडावून सावरगाव येथे फिर्यादी नामे-निलेश नागनाथ तानवडे, वय 21 वर्षे, रा. सावरगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे कडब्याचे गंजीला नमुद आरोपींनी भांडणाचे कारणावरुन आग लावून जाळून निलेश तानवडे यांचे अंदाजे 4 लाख रुपयाचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-निलेश तानवडे यांनी दि.10.03.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 326(एफ), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

<u>भुम पोलीस ठाणे:</u> आरोपी नामे-अरविंद भगतसिंग साळुंके, सचिन भगतसिंग साळुंके, सुरेन करणसिंग गौड, रेखा जगदीश साळुंके,दमयंती भगतसिंग साळुंके, सर्व रा. अहमदाबाद गुजरात, कैलास सुरचंद साळुंके, रा. ठाणे वेस्ट, अशोक किसन साळुंके, रा. नागपुर, सरोज प्रदीप पवार, बेबी चव्हाण रा. मुंबई यांनी दि. 11.01.2025 रोजी 11.00 वा.सु. वालवड शिवारातील शेत गट नं 36 मधील तुरीचे पिकाच्या ढिगाऱ्याला 20 ते 25 क्विटंल आग लावून पेटवून देवून नुकसान केले. फिर्यादीचे शेतातील राखनदार यास शिवीगाळ करुन मारहाण केली. ओमणी गाडीची काच फोडून नुकसान केले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शैलेंद्र प्रताप भाटी, वय 50 वर्षे, रा. वालवड ता. भुम जि. धाराशिव ह.मु. सर्वे नं 62 हाडपसर रेल्वेस्टेशन जवळ मुंडवा पुणे यांनी दि.10.03.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 326(एफ), 324(4), 115(2), 352, 351(2), 189(2), 191(2), 190 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"लैंगीक अत्याचार."**

<u>नळदुर्ग पोलीस ठाणे :</u>एका गावातील एक 20 वर्षीय मुलगी (नाव- गावगोपनीय) 2024 मध्ये 14.00 वा.सु. ही एकटी घरी असताना गावातीलच एका तरुणाने पाणी देण्याच्या कारणावरुन तिस घरात बोलावून घेवून तिचे तोंडात रुमाल कोंबुन तीच्यावर लैंगीक अत्याचार केला. घडल्या प्रकाराची कोठे वाच्यता केल्यास तुला व तुझे कुटुंबियाना जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.वि.सं.कलम-376,506 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"मारहाण."**

<u>उमरगा पोलीस ठाणे :</u>आरोपी नामे-धनराज भानुदास मारेकर रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि. 09.03.2025 रोजी 17.30 वा. सु.माडज शिवार येथे फिर्यादी नामे-अर्जुन बाबु मारेकर, वय 36 वर्षे, रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांना नमुद आरोपींनी पाचट गोळा करण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी व दगडाने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अर्जुन मारेकर यांनी दि.10.03.2025रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम 118(1), 115(2), 352, 351(2), 351(3) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"रस्ता अपघात."**

<u>कळंब पोलीस ठाणे:</u> मयत नामे-विकास हनुमंत महाजन, वय 26 वर्षे, व सोबत प्रशांत विठ्ठल महाजन, वय 32 वर्षे, जखमी नामे- धनाजी संभाजी जाधव, वय 31 वर्षे, रा. बरमाचीवाडी ता. कळंब जि. धाराशिव असे दि.16.02.2025 रोजी 08.24 वा.सु. मोटरसायकल क्र एमएच 25 एएम 2302 ही वरुन खडकी नदीवरील पुलावरुन खडीकी शिवारातुन जात होते. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून विकास महाजन यांचे मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात विकास महाजन व प्रशांत महाजन हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर धनाजी जाधव हे गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अक्षय हनुमंत महाजन, वय 28 वर्षे, रा. बरमाचीवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.10.03.2025 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम 281, 125(अ), 125(बी) 106(1), सह कलम 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस